# राज्य माहिती आयोग, नाशिक खंडपीठ

*(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)*

---

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपिल**
**क्र. रामाआ-नाशिक/व्दितीय अपिल क्र.१२३३/२०२२/नाशिक**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्रीमती. सुनिता रामदास बंदावणे<br>रा. ०३, ड्रीम रेसीडेन्सी गुलमोहर विहार कॉलनी, अशोका वाईन्स जवळ, पाईपलाईन रोड, सातपूर, नाशिक, ता. जि. नाशिक-४२२००७ | निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, दिंडोरी, ता. दिंडोरी, जि. नाशिक | तहसिलदार, तहसिल कार्यालय, दिंडोरी, ता. दिंडोरी, जि. नाशिक. |

**सुनावणी दिनांक —२४/०७/२०२५**

**१. उपस्थिती —**

| अपीलार्थी | विद्यमान जन माहिती अधिकारी | तत्कालीन जन माहिती अधिकारी | विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी | तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| अनुपस्थित | उपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित |

**२. द्वितीय अपील अर्ज —**

(१) द्वितीय अपील अर्जाचा दिनांक : ०८/०२/२०२२
(२) द्वितीय अपील अर्जात नमूद केलेली कारणे : माहिती अपुर्ण दिलेली आहे.
(३) द्वितीय अपील अर्जान्वये केलेली विनंती : माहिती मिळावी.

**३. माहिती अर्ज —**

(१) माहिती अर्जाचा दिनांक : १०/११/२०२१
(२) माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : १५/११/२०२१
(३) कोणत्या कालावधीची संबंधित माहिती हवी आहे तो कालावधी : सन १९७०, १९७१, व सन १९८९ ते १९९०

**(४) जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती** : १) मौजे, दिंडोरी येथील पुर्वी चा सर्वे, नं.१०३/१, हा व त्याचा आताचा गट नं.४४७/१ असा आहे. सर्वे नं.१०३/१, पुर्वी चे मालक, केशव हरी पगारे हे होते, त्यांनी, दि.०५/०८/१९७१, दस्त नं. ४८७, ने शर्तीचे खरेदी खत, श्री फुलचंद लखमीचंद खिवसरा रा दिंडोरी यांना अटीशर्तीवर, दस्त नोंदऊन दिलेला होता त्याची गाव दप्तरी नोंद नं.४२५३, ने झाली नोंद मंजुर करते वेळी, श्री फुलचंद लखमीचंद खिवसरा हे स्वता दिंडोरी येथील शेतकरी होते किंव्हा नाही तसेच शर्तीचे खरेदी खत करतेवेळी त्यांनी कुठल्या जमीनी चा शेतकरी असल्या बाबत चा पुरावा दिलेला होता, त्याची नक्कल मिळावी. स्वत: फुलचंद लखमीचंद खिवसरा हे जर शेतकरी खातेदार नसतील तर तसे पत्र मिळावे, अर्जा सोबत नोंद नं. ४२५३ व सातबारा ची झेरॉक्स प्रत जोडलेली आहे. २) फुलचंद लखमीचंद खिवसरा यांची वारस रजीस्टर ची प्रत मिळावी.

**(५) जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही** : सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, दिंडोरी, यांनी दि.१०/०१/२०२२ रोजीच्या पत्रान्वये, आपण या कार्यालयाकडेस अर्ज दिलेला आहे. सदर अर्जात नमुद केलेप्रमाणे मौजे दिंडोरी ता. दिंडोरी येथील पुर्वीचा सर्वे नंबर १०३/१ व त्याचा आताचा गट नं ४४७/१ असा आहे. सर्वे नं १०३/१ पुर्वी चे मालक केशव हरी पगारे हे होते, त्यांनी दि. ०५/०८/१९७१ दस्त नं ४८७ ने शर्तीचे खरेदी खत श्री फुलचंद लखमीचंद खिवसरा रा. दिंडोरी यांना अटी शर्तीवर दस्त नोंदवून दिलेला होता, त्याची गावी दप्तरी नोंद नं ४२५३ झालेली आहे. सदर नोंदीचे कागदपत्र यासमवेत जोडून पाठविले आहे. सोबत पानांक-१ से ६ जोडले आहे. असे अपिलार्थी यांना कळविले असल्याचे दिसून येते.

**४. प्रथम अपील -**

(१) प्रथम अपील अर्जाचा दिनांक : ३१/१२/२०२१

(२) प्रथम अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : ०३/०१/२०२२

(३) प्रथम अपील दाखल करण्याचे कारण : उडवा उडवी चे उत्तर दिले व पेपर देण्यास टाळाटाळ केली आजपर्यंत उत्तर आले नाही.

**(४) अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही :** अपीलार्थी यांनी दाखल केलेल्या प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार, तहसिल कार्यालय, दिंडोरी, यांनी दिनांक १०/०१/२०२२ रोजी सुनावणी घेऊन त्यामध्ये जन माहिती अधिकारी तथा विद्यमान प्रभारी निवासी नायब तहसिलदार यांनी अर्जदार यांचे माहिती अधिकार अर्जाचे अनुषंगाने उपलब्ध कागदपत्रे १५ दिवसांत विनामुल्य उपलब्ध करुन दयावी असे नमुद करुन प्रथम अपील निकाली काढण्यात आले असल्याचे दिसून येते.

**५. युक्तीवाद/लेखी खुलासा –**

- **जन माहिती अधिकारी –** जन माहिती अधिकारी यांनी २४/०७/२०२५ रोजी आयोगास लेखी खुलासा सादर केला असुन त्यामध्ये असे नमुद केले आहे की, सौ. सुनिता रामदास बंदावणे यांनी दि.१५/११/२०२१ रोजी तहसिल कार्यालय दिंडोरी येथे माहिती अर्ज दाखल केला होता. सदर माहिती अधिकाराचे दि.१०/०१/२०२२ रोजी प्रथम अपिलांतर्गत सुनावणी घेण्यात आली असुन दि.१०/०१/२०२२ रोजी या कार्यालयात अर्जाच्या अनुषंगाने उपलब्ध असलेली माहिती अर्जदारास पुरविणेत आलेली आहे.
- तरी आज दि. २४/०७/२०२५ रोजी व्दितीय अपिलाचे सुनावणी दरम्यान अर्जदारास अर्जाचे अनुषंगाने या कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती विनामुल्य पुरविण्यात येत आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम २ (एफ) नुसार जनमाहिती अधिकाऱ्याने फक्त सार्वजनिक प्राधिकरणाकडे उपलब्ध असलेली माहिती आहे त्या स्वरुपात पुरविणे अपेक्षित आहे. तरी अपिलकर्त्यास आज रोजी या कार्यालयात उपलब्ध माहिती पुरविणेत येत आहे तरी सदर जबाब सविनय सादर.
- **प्रथम अपीलीय अधिकारी –** दिनांक १०/०१/२०२२ रोजी सुनावणी घेऊन आदेश पारित केलेले आहेत.

**६. निष्कर्ष –**

(१) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, दिंडोरी, यांनी अपीलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दिनांक १०/०१/२०२२ रोजीच्या पत्रान्वये, कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती दिल्याचे दिसून येते.

(२) तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार, तहसिल कार्यालय, दिंडोरी, यांनी अपीलार्थी यांच्या प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने दि.१०/०१/२०२२ रोजी सुनावणी घेऊन जन माहिती अधिकारी यांनी १५ दिवसांत विनामुल्य माहिती पुरविण्यात यावी असे आदेशित केले असल्याचे दिसून येते.

(३) अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती हि त्रयस्थ पक्षाची माहिती असल्याचे दिसून येते.

(४) जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपिलनिर्णयानंतर उपलब्ध माहिती दिली असल्याचे दिसुन येते.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

प्रस्तुत द्वितीय अपिल क्र.१२३३/२०२२/ नाशिक निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग खंडपीठ नाशिक

**(भुपेंद्र गुरव)**
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नाशिक

**जावक क्र.** 6631

**20 NOV 2025**